

संस्कृत साहित्य सरिता

प्रतिमा

संस्कृत
साहित्य
सरिता
: ५

भास-कृत

प्रतिमा

कथासार
अमरेन्द्र

वोरा अँन्ड कंपनी, पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अॅन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ती : १९५६

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. 'संस्कृत-साहित्य-सरिता' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे. तें तसें घडो, हीच इच्छा.

—प्रकाशक

परिचय

कालक्रमाच्या दृष्टीनें भास हा कांहींच्या मतें ' पहिला संस्कृत नाटककार' मानला जातो. याचा काल इसवी सन पूर्व दुसरें शतक ठरविण्यांत आला आहे. भासाच्या नांवावर एकूण तेरा नाटकें असून त्यांचा शोध अलीकडेच १९१२साली त्रावणकोर संस्थानांत त्रिवेंद्रम येथें लागला. त्यापूर्वी त्याचें नांव माहीत होतें पण त्याच्या नाट्य-कृतींचा मात्र पत्ता लागत नव्हता. सरळ व सुबोध लेखन-शैली हें भासाचें वैशिष्ट्य आहे; तसेंच बहुधा कथानकाचें आदर्शवादी वळण हेंहि त्याचें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल. महाभारताच्या कथेंत आपल्या मनाप्रमाणें हवा तो व हवा तितका बदल करून लिहिलेलें 'पंचरात्र' आणि कांहींसें त्याच धर्तीवर असलेलें रामायणाच्या कथेवरील हें 'प्रतिमा' नाटक हीं दोन उदाहरणेंहि त्या दृष्टीनें विचारांत घेतल्यास पुरेशीं आहेत.

'प्रतिमा' नाटकांत भरताच्या थोर अंतःकरणाचा ठसा ठसठशीतपणें उमटवण्याचा प्रयत्न असला तरी रामायणांतील इतर व्यक्तींची थोरवीहि त्या प्रयत्नांत कमी लेखली गेलेली नाहीं. पण कैकयीच्या कृतीचा हेतु अगदीं वेगळा दाखवून तिलाहि या आदर्श रामायणीय व्यक्तींच्या मालिकेंत बसविण्याचा प्रयत्न नाटककारानें केला आहे. हें इष्ट कीं अनिष्ट याचा खल न करताहि एकंदरीत नाटक या दृष्टीनें 'प्रतिमा' वाचकाच्या मनावर चांगला परिणाम घडविणारें आहे इतकें निःसंशय.

— लेखक

प्रतिमा

श्रीरामचन्द्राच्या राज्याभिषेकाची सर्व तयारी झाली होती. मंगल वाद्यें वाजूं लागलीं होतीं. इतक्यांत एकाएकीं राजा दशरथाच्या कैकयी राणीची दासी मंथरा हिनें दशरथाच्या कानापाशीं येऊन हळूच कांहींतरी सांगितलें. लगेच सगळ्या रंगाचा बेरंग झाला. आणि श्रीरामचन्द्र अयोध्येच्या राजसिंहासनावर बसण्याऐवजीं चौदा वर्षांसाठीं वनांत निघाले. त्या प्रसंगानें या ' प्रतिमा ' नाटकाचा प्रारंभ झाला आहे. तथापि भरताच्या मनावर या गोष्टीचे काय काय परिणाम झाले आणि त्यामुळें तो कसा वागला हेंच विशेषतः यांत दाखविलें आहे. भरत आपल्या आजोळाहून परत आला तेव्हां अयोध्या नगरीच्या बाहेर त्याच्या पूर्वजांच्या प्रतिमा म्हणजे मूर्ति असलेलें एक देऊळ होतें. त्यांत तो सहज म्हणून गेला. त्या सर्व प्रतिमा त्याच्या मृत पूर्वजांच्या होत्या. त्यावरूनच त्याला दशरथाच्या, त्याच्या वडिलांच्या मृत्यूची भयंकर हकीकत कळली. प्रतिमेवरून ही हकीकत कळली म्हणून नाटककारानें याला ' प्रतिमा ' असें नांव दिलें आहे.

इक्ष्वाकु राजघराण्याची परंपरा थोर होती. तरुणपणांत उत्तम प्रकारें प्रजेचें रक्षण व पालन करावें आणि म्हातारपणा येतांच मुलाला राज्यावर बसवून आपण वनांत तपश्चर्येसाठीं चालावयास लागावें, असा या राजांचा प्रघात होता. त्याप्रमाणें, राजा दशरथ म्हातारा झाला. त्यानें

पाहिलें कीं आपला थोरला मुलगा राम हा राज्याचा भार आपल्या खांद्यावर घेण्यास योग्य झाला आहे. म्हणून त्यानें रामाला राज्याभिषेक करण्याचें ठरविलें.

✠✠
✠✠

दशरथानें रामाला आपल्याजवळ बोलावून घेतलें. आपण आतां म्हातारे झालों आहोंत तेव्हां राज्याची ही जोखीम तूं आपल्या शिरावर घे, म्हणजे आपल्याला वनांत तपासाठीं निघून जातां येईल, असें त्यानें रामाला सांगितलें. रामाचें आपल्या पित्यावर अतिशय प्रेम असल्यानें त्यानें या गोष्टीला प्रथम होकार दिला नाहीं. परंतु दशरथानें कोसल देशाचें संयुक्त राज्य स्वीकारण्यासाठीं त्याला आपल्या प्राणाचीच शपथ घातली. तेव्हां रामाचा नाइलाज होऊन त्यानें आपल्या राज्याभिषेकाला संमति दिली.

राज्याभिषेकाची तयारी झाली. राजवाड्यांत दुंदुभी वाजूं लागल्या. रामाला सिंहासनावर बसविलें. लक्ष्मण व शत्रुघ्न अभिषेकपात्रें हातीं धरून उभे राहिले. स्वतः राजा दशरथानें रामावर छत्र धरलें. त्याचे डोळे आनंदाश्रूंनीं डबडबले होते. इतक्यांत मंथरा घाईघाईनें आली. दशरथाच्या कानांत कांहीं कुजबूजून गेली. आणि दशरथानें रामाला सिंहासनावरून खालीं उतरण्यास सांगितलें. लगेच राम ज्या शांतपणानें सिंहासन सोडून निघून गेला, तें पाहून लोक थक्क झाले. परंतु रामाच्या दृष्टीनें त्यांत नवल वाटण्यासारखें काय होतें ? मुलानें बापाची आज्ञा पाळली, हें त्यानें आपलें कर्तव्यच केलें होतें.

सीतेला यांतलें कांहींच माहीत नव्हतें. ‘ राज्याभिषेक ’

‘ राज्याभिषेक ’ असें कांहींसें तिची एक दासी पुटपुटतांना तिनें ऐकलें. दुसऱ्या एकादोघां दासींनीं तिला येऊन सांगितलें कीं, युवराज रामाला राज्याभिषेक होत आहे आणि तो स्वतः महाराज दशरथच करीत आहेत. ती आनंदाची बातमी ऐकून सीतेला मोठा हर्ष झाला. तिनें ती बातमी आणणाऱ्या दासीला आपल्या अंगावरचे दागिने उतरून दिले.

त्यानंतर तिच्या कानावर राजवाड्यांतील दुंदुभी वाजत असल्यांचाहि आवाज पडला. परंतु लगेच तो बंद पडल्याचेंहि तिच्या लक्षांत आलें. त्यामुळें तिला एकदम खटकल्यासारखें झालें. ती त्याबद्दल आपल्या दासीला कांहीं विचारते आहे इतक्यांत स्वतः रामच तिथे येऊन उभा राहिला.

रामानें तिला राज्याभिषेकाचा आणि तो अकस्मात बंद पडल्याचाहि सारा वृत्तान्त सांगितला. त्यावर सीता एवढेंच म्हणाली कीं, माझे प्रिय पति प्रिय पतीच राहिले आणि महाराज महाराजच राहिले ही चांगलीच गोष्ट झाली.

रामानें सीतेकडे पाहून विचारलें कीं, तूं आपले दागिने काढून कां ठेविले आहेस? आणि हीं वल्कलें कशासाठीं नेसली आहेस? त्यावर सीतेनें खरी हकीकत त्याला कळूं न देण्याचा प्रयत्न केला. परंतु रामानें म्हटलें कीं, मग माझ्यासाठींहि वल्कलें आणव. इक्ष्वाकु कुलांतील म्हाताऱ्या माणसांचा हा अलंकार मलाहि आवडतो. सीतेनें त्याला नकार दिला. ‘ असलें अभद्र बोलूं नये ’ असें म्हणून तिनें अशीहि भीति प्रकट केली कीं, राज्याभिषेक समारंभ

सोडून यावें लागल्यामुळें रामावर कांहीं अरिष्ट कोसळेल कीं काय असें वाटतें.

हें त्यांचें बोलणें चालू आहे तोंच कंचुकी तेथें आला व त्यानें सांगितलें कीं, कैकयीनें भरताला राज्यावर बसविण्याचा हट्ट धरल्यामुळें दशरथ महाराज दुःखानें बेशुद्ध होऊन पडले आहेत. राणी कैकयीच्या या वागण्याबद्दल कंचुकी तिची निंदा करूं लागला. परंतु रामानें त्याला तसें न करण्याविषयीं बजावलें. एवढयांत लक्ष्मण तेथें आला तो हातीं धनुष्य-बाण घेऊनच. तो संतापानें नुसता लाल होऊन गेला होता. शांतीचा सागर लक्ष्मण इतका संतापलेला पाहून रामालाहि वाटलें कीं तशीच कांहींतरी विलक्षण घटना घडलेली असली पाहिजे. 'जगांतून सारी स्त्रीजात नाहींशी करण्याचाच मी निश्चय केला आहे' असें लक्ष्मण म्हणत होता. लक्ष्मणाचा हा भयंकर राग भरताला राज्य मिळणार यामुळेंच झाला असावा अशी रामाची समजूत झाली. त्याबद्दल राम त्याला थोडें लावूनहि बोलला. त्यामुळें लक्ष्मणाच्या डोळ्यांत आंसवें आलीं. वास्तविक लक्ष्मणाला राज्यलोभ शिवलासुद्धां नव्हता. त्यानें सांगितलें, "रामा, तुम्हांला चवदा वर्षं वनवासांत काढावीं लागणार याचेंच मला दुःख झालेलें आहे; भरताला राज्य मिळणार म्हणून नव्हे."

तेव्हां मात्र रामाच्या ध्यानांत आलें, कीं आपल्या वडिलांना मूर्च्छा येण्याचें खरें कारण आपला वनवास हेंच असलें पाहिजे. त्यांनीं लगेच सीतेला म्हटलें, "मैथिली, आण तीं

वल्कलें इकडे. एका उदात्त हेतूसाठीं मला त्यांचा उपयोग करूं दे. इतर कोणाहि राजांना दुर्लभ असें हें अत्यंत पवित्र सत्कृत्य माझ्या हातून घडूं दे."

सीतेनें वल्कलें रामाला दिलीं आणि ती स्वतःहि आपल्या पतीबरोबर वनांत जावयास निघाली. तेव्हां रामानें लक्ष्मणाला तिचें वनांत न जाण्यासाठीं मन वळविण्यास सांगितलें. परंतु लक्ष्मणानें उलट सीतेचीच बाजू घेतली आणि उत्तर दिलें कीं, "राहूनें ग्रासलेल्या चंद्राला रोहिणी, अरण्यांतल्या उन्मळून पडणाऱ्या वृक्षाला वेल किंवा चिखलांत रुतलेल्या हत्तीला हत्तीण सोडून जात नाहीं. तेव्हां सीतादेवींनीं तुमच्या मागोमाग यावें हेंच योग्य आहे. स्त्रीला पतिशिवाय दुसरा रक्षणकर्ता कोण असणार!"

सीता रामाबरोबर वनांत जावयास निघाली. तसाच लक्ष्मणहि निघाला. तेव्हां रामानें सीतेला म्हटलें कीं, लक्ष्मणाला या विचारापासून परावृत्त कर. त्यावर लक्ष्मणानें विनयानें सांगितलें कीं, "देवी, तुम्ही माझ्या थोरल्या बंधूची एकट्यानेंच कशी सेवा करणार. तुम्ही उजव्या पायाची सेवा करा, मी डाव्याची करीन."

लक्ष्मणासह सर्वांनीं वल्कलें नेसलीं. तिघेंहि वनांत जावयास निघालीं. ही दुष्ट वार्ता अयोध्येंत वणव्यासारखी पसरली. अयोध्येचे रस्ते नागरिक स्त्रीपुरुषांनीं तुडुंब भरून गेले. राम-लक्ष्मण-सीता यांना बाहेर जावयास वाट मिळण्याचीहि मारामार पडली. तेव्हां लक्ष्मण वाट काढीत पुढें झाला. सीतेनें रामाच्या सांगण्यावरून आपल्या तोंडा-

वरील अवगुंठन किंवा पडदा दूर केला. राम वनवासांत जाणार म्हणून दुःखानें विव्हल झालेल्या नागरिकांनीं सीतेसह सर्वांना डोळे भरून पाहून घेतलें.

इतक्यांत कंचुकी सांगत आला कीं, "जमिनीवरील मातीनें अंग माखलेला राजा दशरथ तुमच्या भेटीसाठीं येत आहे. तेव्हां तुम्ही थांबा, जाऊं नका."

परंतु पित्यानें आपल्याला अशा स्थितींत पाहावें हें रामाला बरें वाटेना. म्हणून तीं तिघेंहि तेथून त्वरेनें वनाकडे निघून गेलीं.

२ ...

राम वनांत निघून गेल्यापासून अयोध्येंत स्मशानशांतता पसरली. हत्तींनीं खाणें टाकलें, घोडे खिंकाळेनातसे झाले, स्त्रीपुरुष नागरिकांनीं अन्नपाणी सोडून दिलें आणि ते खालीं माना घालून दुःखी चेहऱ्यांनीं आपसांत कुजबुजूं लागले. राम-सीता-लक्ष्मण ज्या दिशेनें निघून गेलीं त्या दिशेकडे पाहून भयंकर विलाप करतांना ते दिसूं लागले.

राजा दशरथाच्या दुःखाला तर सीमाच राहिली नव्हती. सत्यवचनी, संयमी, मत्सररहित, लोकप्रिय आणि वृद्धांच्या सेवेंत तत्पर असलेला राम कोठें गेला म्हणून तो सारखा विचारीत होता. सूर्य अस्ताला जावा तसा राम निघून गेला. सूर्यामागोमाग दिवस संपावा त्याप्रमाणें लक्ष्मणहि त्याच्या मागोमाग नाहींसा झाला; आणि ते दोघेहि गेल्या-

मुळें सीताहि, सूर्य व दिवस यांच्या अस्तामुळें छाया नाहींशी व्हावी त्याप्रमाणें दिसेनाशी झाली. “मला निपुत्रिक, रामाला दुसऱ्या कोणातरी राजाचा मुलगा आणि कैकयीला अरण्यांतली एखादी वाघीण कां नाहीं केलेंस ?” असा प्रश्न मोठ्या उद्वेगानें दशरथानें मृत्यूला उद्देशून विचारला. “मुलीं वैदेही, रामानें माझा त्याग केला, लक्ष्मणानें धिक्कार केला आणि तूंहि मला दूर सारलेंस ना ?” असें तो दुःखानें अंतःकरण पिळवटून म्हणूं लागला.

त्यावेळीं दशरथाजवळ कौसल्या व सुमित्रा या दोन राण्या बसलेल्या होत्या. दशरथाचा तो करुण विलाप कौसल्येला पाहवेना. तेव्हां ती त्याला धीर देत म्हणाली, “नाथ, असा भयंकर शोक करून आपल्या जीवाला कष्ट देऊं नका. वैदेही आणि दोघेहि मुलगे वनवासाचा काळ संपला कीं तुमच्या दृष्टीला पडतीलच.”

परंतु दशरथाला आपल्याशीं कोण बोलत आहे याचीहि शुद्ध नव्हती. त्यानें विचारलें कीं, तूं कोण ? “नावडत्या पुत्राची मी माता” म्हणून कौसल्येनें उत्तर दिलें. परंतु राम कौसल्येच्या गर्भांत वाढला म्हणून दशरथानें तिचा गौरव केला. जवळच सुमित्रा होती, तिच्याकडे पाहात दशरथानें विचारलें “ही दुसरी स्त्री कोण ?” दशरथ पुत्र-शोकानें अगदीं बेभान होऊन गेला होता, त्यामुळें तो तिलाहि ओळखूं शकला नव्हता. तेव्हां कौसल्या म्हणाली, “नाथ, आपला बाळ लक्ष्मण—”

परंतु कौसल्येला तिचें वाक्य पुरेंहि न करूं देतां दशरथ

जागचा तटकन् उठत विचारूं लागला, "कुठे, कुठे आहे माझा लक्ष्मण ? तो तर कुठे दिसत नाहीं. अरेरे!" दशरथाची ती अवस्था पाहून चटकन् दोन्ही राण्या पुढें धांवल्या व त्यांनीं राजाला सांवरून धरलें. कौसल्येनें सांगितलें, "लक्ष्मण नव्हे, ही लक्ष्मणाची आई सुमित्रा म्हणून म्हणत होत्यें मी." तेव्हां दशरथ सुमित्रेलाहि गौरवून म्हणाला, "रघुकुलोत्तम रामाच्या पाठीशीं रात्रंदिवस सांवलीप्रमाणें राहणारा योग्य पुत्र खरोखरी तुलाच लाभला."

इतक्यांत कंचुकीनें येऊन वर्दी दिली कीं, सुमंत्र परत आले आहेत. सुमंत्र एकटाच परतलेला आहे, त्यानें रामाला आपल्याबरोबर आणलेलें नाहीं हें समजल्यावर दशरथाला दु:खाचा पुन्हा उमाळा आला. त्यानें आणि सुमित्रेनेंहि विचारलें कीं, त्यांनीं आमच्यासाठीं कांहीं निरोप दिला आहे काय? सुमंत्रानें सांगितलें कीं, राम, जानकी व लक्ष्मण हीं तिघेंहि श्रृंगवेरपुरांत रथांतून खालीं उतरलीं आणि अयोध्येकडे तोंड करून दशरथाला आदरानें नमस्कार करीत त्यांनीं कांहीं बोलण्याचा प्रयत्न केला. परंतु बराच वेळ प्रयत्न करूनहि त्यांचीं अंत:करणें भरून आल्यामुळें त्यांच्या तोंडून शब्दहि फुटला नाहीं. आणि मग तीं तशींच वनाकडे निघून गेलीं. हें कळल्यानंतर मात्र दशरथाला आपलें दु:ख असह्य झालें. "कैकयीला सांगा कीं राम गेला, तूं सुखी हो! आतां मीहि हें जग सोडून जातों," असें म्हणून तो बेशुद्ध पडला तो कायमचाच. राम-वैदेही-लक्ष्मण यांचा उच्चार करीत त्यानें प्राण सोडला.

३ ***

या सर्व भयंकर घटना घडल्या तेव्हां भरत आपल्या आजोळीं कैकय देशांत होता. त्याला आणण्यासाठीं ताबडतोब सारथ्यासह रथ रवाना झाला. ह्या कुशल सारथ्यानें अति वेगानें रथ हांकीत भरताला परत आणलें. प्रवासांत भरतानें आपल्या वडिलांचें कुशल नानातऱ्हांनीं विचारलें. त्यावर, त्यांची प्रकृति अत्यवस्थ आहे इतकेंच सारथ्यानें त्याला सांगितलें. दशरथाच्या निधनाबद्दल तो बोलला नाहीं.

भरत आपल्या आईवडिलांच्या भेटीसाठीं अतिशय उत्सुक झाला होता. रथ फारच हळू चालत आहे असें त्याला वाटत होतें. आसपासच्या वृक्षांची टवटवी पाहून सारथ्यानें अनुमान केलें कीं, आपण अयोध्येजवळ येऊन पोहोंचलों आहोंत. भरतालाहि तें कळतांच आपल्या आवडत्या वडील माणसांच्या भेटीचीं सुखस्वप्नें तो पाहूं लागला. आपण आपल्या वडिलांच्या पावलांपुढें माथा नमविला आहें, ते आपल्याला प्रेमभरानें वर उचलून घेताहेत, लगेच आपले सगळे भाऊ घाईगर्दीनें आपल्याभोंवतीं गोळा झाले आहेत, आपल्या माता आपल्याला अश्रूंनीं न्हाऊं घालीत आहेत, असें दृश्य भरत आपल्या मनःचक्षूंसमोर पाहात होता. त्या बिचाऱ्या निष्पाप जीवाला काय कल्पना कीं इकडे अयोध्येंत काय काय अनर्थ गुदरला आहे! ह्या स्वामिभक्त सारथ्यालाहि हें दिसलें परंतु त्याच्या पित्याचा मृत्यु, आईचा राज्यलोभ

आणि भावाचा वनवास या तिन्ही दुष्ट गोष्टी त्याला सांगण्यास तो धजला नाहीं.

इतक्यांत राजधानींतून गुरुजनांकडून निरोप आला कीं कृत्तिका नक्षत्र आतां कांहीं अंशच राहिलेलें आहे. लवकरच रोहिणीचें शुभ नक्षत्र लागेल तेव्हांच भरतानें अयोध्येंत प्रवेश करावा. त्यामुळें भरत रथांतून खालीं उतरला. मध्यंतरीचा हा वेळ घालविण्यासाठीं विश्रांति घेत कोठें थांबावें याचा तो विचार करीत आहे तोंच दूर झाडींत त्याला एक देऊळ दिसलें. म्हणून तो तिकडेच निघाला. जवळ जाऊन पाहातो तों त्या मंदिरांत त्याला दगडाच्या सुंदर सुंदर प्रतिमा दिसल्या. त्या मूर्तींवर लाह्या व फुलें नुकतींच कोणीतरी वाहिलेलीं दिसत होतीं. त्या मूर्ति पाहून भरत मोठा प्रसन्न झाला. या मूर्ति कोणाच्या असाव्यात असा तो विचार करीत आहे इतक्यांत देवळाचा पुजारी तेथें आला. त्यानें सांगितलें कीं इक्ष्वाकु राजांचें हें मंदिर आहे.

तेथें एकूण चार मूर्ति–दगडी प्रतिमा होत्या. त्यांतील पहिल्या तिहींची माहिती पुजाऱ्यानें भरताला करून दिली. दिलीप, रघु आणि अज या तिघांच्या त्या मूर्ति होत्या. अयोध्येचे हे तिन्ही राजे मृत्यु पावलेले होते. त्यामुळें चौथ्या प्रतिमेकडे पाहातांच भरत मनांत चरकला. कारण ती प्रतिमा होती दशरथाची. म्हणून त्यानें भीतभीतच विचारलें कीं, येथें फक्त मृत राजांच्याच मूर्ति ठेवतात

कीं कसें ? त्यावर पुजाऱ्यानें सांगितलें कीं फक्त मृतांच्याच. पण त्यानें लगेच म्हटलें, "पत्नीच्या ऐश्वर्य-लोभामुळें जीवित व राज्य यांना मुकलेल्या या दशरथ महाराजां-विषयीं तुम्हीं कसें कांहीं विचारलें नाहींत ?" ते भयंकर शब्द कानीं पडतांच मात्र भरताची खात्री होऊन चुकली कीं आपली भीति खरी ठरलेली आहे. आपले वडील मृत्यु पावलेले आहेत.

हळुहळु भरताला त्या पुजाऱ्याकडून सगळी हकीकत कळली. वडील आणि भाऊ नसलेल्या अयोध्येंत जाणें म्हणजे तहानेलेल्यानें कोरडया पडलेल्या ओढयाकडे धांव घेण्यासारखेंच आहे, असें तो म्हणाला. आपल्या आईनें आपल्याला राज्यावर बसविण्याचा आग्रह धरल्यामुळेंच वडील मृत्यु पावले आणि रामाला वनवासांत जावें लागलें, हें ऐकून भरताला मूर्च्छा आली. परंतु तितक्यांत तिन्ही राण्या सुमंत्रासह तेथें येऊन पोहोंचल्या. भरतानें कौसल्या व सुमित्रा या आपल्या दोन्ही सावत्र आयांना नमस्कार केला. त्यांनींहि भरताला आशीर्वाद दिले. परंतु स्वतःची आई कैकयी दृष्टीला पडतांच तो तिच्यावर कडाडून म्हणाला, " हे दृष्ट स्त्रिये, गंगा व यमुना या नद्यांच्या-मध्यें एकादी क्षुद्र नदी असावी त्याप्रमाणें या दोन मातांच्यामध्यें तूं अगदीं विसंगत दिसत आहेस. " कैक-यीनें, " मीं ही गोष्ट कां केली तें मागाहून तुला समजा-वून सांगेन " असें म्हटलें. भरताची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. इतकेंच नव्हे तर कौसल्येनेंहि त्याला आपल्या स्वतःच्या आईला नमस्कार करण्याविषयीं सांगून पाहिलें.

परंतु भरत इतका भयंकर संतापला होता कीं, तो आपल्या आईला आई म्हणावयालाहि आतां तयार नव्हता!

दशरथ राजांना आपला शब्द राखतां यावा म्हणून आपण हें सर्व केलें, असें समर्थन कैकयीनें करून पाहिलें. परंतु त्याहि बाबतींत भरतानें आपल्या बंधुप्रेमानें व अंतःकरणाच्या थोरवीनें तिला निरुत्तर करून टाकलें. " तुझें काळीज ब्रह्मदेवानें दुराग्रहाच्या काठिण्यानेंच बनविलें असलें पाहिजे " असेंहि तो तिला बोलला. इतक्यांत सुमंत्रानें सांगितलें कीं, वसिष्ठ-वामदेव प्रजाजनांना बरोबर घेऊन तुझ्या राज्याभिषेकासाठीं येत आहेत; कारण गुराख्यावांचून जशा गाई तसेंच राजावांचून राज्य नाश पावतें. परंतु भरत राज्यावर बसावयाला मुळींच तयार नव्हता. तो म्हणाला, " लोकांना माझ्या मागें येऊं दे. " त्यावर सुमंत्रानें विचारलें कीं, " राज्याभिषेक सोडून तूं जाणार तरी कोठें ? " परंतु राज्याभिषेकासंबंधीं तुच्छता दर्शवीत भरतानें टोमणा मारला कीं, " राज्याभिषेक आमच्या आईसाहेबांनाच शोभून दिसेल ! मी लक्ष्मणप्रिय रामाकडे जाणार; कारण राम नसलेली ती अयोध्याच नव्हे; जिथे राम असेल तीच खरी अयोध्या. "

४ ...

रामाच्या भेटीसाठीं भरत तपोवनांत निघून आला. सुमंत्रानें रथ रामाच्या आश्रमापाशीं नेऊन उभा केला.

आपल्या आईच्या समाधानासाठीं राज्याच्या अधिकारावर पाणी सोडणारा राम भरताला एक थोर विभूतीच वाटत होता. आश्रमापाशीं येतांच सुमंत्र म्हणाला, " युवराज, येथें या आश्रमांत थोर राम, सद्गुणी सीता व उदार लक्ष्मण राहात आहेत. सत्य, सद्गुण आणि श्रद्धा यांच्या अनुक्रमें या तीन मूर्तीच वाटतात. "

भरताच्या सांगण्यावरून सुमंत्रानें रथ थांबवला. रामाला जाऊन काय सांगूं,असें सुमंत्रानें विचारतांच भरतानें सांगितलें, " राज्यलोभी कैकयीचा पुत्र आला आहे म्हणून सांगा. " परंतु वडील माणसांचे दोष बोलून दाखवणें बरें नव्हे, असें सुमंत्रानें म्हटल्यामुळें भरतानें सांगितलें, "बरोबर आहे, दुसऱ्यांचे दोष आपण कशाला प्रकट करावेत ! मग तुम्ही असें सांगतां का कीं, " इक्ष्वाकु कुळाचा कलंक भरत भेटीसाठीं आला आहे म्हणून ? " परंतु असें म्हणण्यालाहि सुमंत्रानें नकार दिला. तेव्हां भरत म्हणाला कीं, " मग मी स्वतःच सांगतों कीं, कोणीतरी एक कपटी, कृतघ्न, असभ्य, साहसी परंतु तरीहि तुमच्या ठिकाणीं भक्ति असलेला येथें आला आहे. त्यानें येथें थांबावें कीं येथून चालतें व्हावें ? "

भरताचा आवाज रामानें व त्यानंतर सीता व लक्ष्मण यांनींहि ऐकला. त्यावरून त्यांची इतकीच खात्री झाली कीं, इक्ष्वाकु वंशांतल्या कोणातरी व्यक्तीचा हा आवाज आहे. खात्री करून घेण्यासाठीं लक्ष्मण बाहेर आला तेव्हां भरत त्याच्या दृष्टीला पडला. लक्ष्मण क्षणभर बुचक-

ळ्यांत पडला कीं हा प्रत्यक्ष रामच आहे कीं काय ! इतकें त्या दोघांत साम्य होतें. परंतु नंतर त्यानें सुमंत्राला पाहिलें तेव्हां सुमंत्रानें भरत रामाच्या भेटीसाठीं आला असल्याचें सांगितलें. लक्ष्मणानें त्याचें स्वागत करून त्याला तेथेंच थांबावयास सांगून तो आंत रामाकडे गेला. भरत आल्याचें कळतांच राम सीतेला म्हणाला, " पाहा, मैथिली, वडिलांना किती दु:ख झालें असेल याची आज मला खरी कल्पना आली. भावाचें जर इतकें प्रेम तर पित्याचें आपल्या पुत्रावर याहून कितीतरी पटींनीं प्रेम असेल, हें अगदीं साहजिकच आहे. "

मग रामाच्या आग्रहावरून स्वत: सीतेनेंच अश्रुपूर्ण नेत्रांनीं भरताचें स्वागत केलें. राम-भरत एकमेकांना कडकडून भेटले. भरतानें आग्रहपूर्वक रामाला म्हटलें कीं तुम्ही येऊन अयोध्येच्या राज्याचा स्वीकार करा; मला तुमची सेवा करण्यांत धन्यता वाटेल. परंतु रामानें सांगितलें, " तूं असा विचारहि मनांत आणूं नकोस. मी हा जो वनवास पत्करला आहे तो वडिलांचें वचन पाळण्यासाठीं; भयाने, भ्रमानें किंवा अभिमानामुळेंहि नव्हे. हें लक्षांत घे कीं, आपल्या घराण्यांत सत्य हेंच धन मानलेलें आहे; मग तूं तरी असा हीन मार्ग कसा सुचवतोस ? "

परंतु भरतानेंहि उलट तोच युक्तिवाद करून थोरल्या भावाला बाजूला सारून स्वत: राज्यावर बसणें हेंहि तितकेंच हीनपणाचें आहे, असें रामाला दाखवून दिलें. तो म्हणाला, " हे उदारधे, आईचे दोष मुलाच्या अंगीं

चिकटवूं नका. या दु:खित भरताचा सहानुभूतीनें विचार करा." रामहि त्याच्या मनाचा तो विलक्षण थोरपणा पाहून प्रसन्न झाला. "तुझ्या अमोल सद्गुणांनीं तूं मला जिंकलें आहेस" असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले. तथापि, कांहींहि झालें तरी जेणेंकरून पित्याचें वचन खोटें होईल असें कांहींहि करावयास राम तयार नव्हता. भरतानें तर असा हट्ट धरला कीं, "मग तुमचें हें वचन-प्रतिपालन पूर्ण होईपर्यंत मी तुमचे पाय धरून येथेंच राहाणार." उलट रामानें भरताला शपथ घातली कीं, पुत्राच्या कृत्यांमुळें पित्याला सद्गति मिळत असते. तेव्हां तुला राज्याचा सांभाळ हा केलाच पाहिजे.

भरतानें एका अटीवर ही गोष्ट मान्य केली. चौदा वर्षांनीं वनवास संपून परत आल्यावर रामानें आपल्या राज्याचा स्वीकार करावा, तोंपर्यंत भरतानें राज्याचा कारभार केवळ विश्वस्त म्हणून पाहावा. रामानें त्याचें तें म्हणणें मान्य केलें. भरतानें सीता, लक्ष्मण व सुमंत्र यांना साक्षी ठेवून भरतानें तें पक्कें करून घेतलें. याशिवाय भरतानें आणखी एक गोष्ट रामाकडून मागून घेतली. "तुमच्या पायांतील पादुका मला द्या. तुम्ही जोंपर्यंत वनवासांतून परत येत नाहीं, तोंपर्यंत मी या पादुकांचाच दास होऊन त्यांचीच सेवा करीत राहीन." असें सांगून भरतानें त्याच पादुकांवर राज्याभिषेक करण्याबद्दलहि रामाची संमति मिळविली. इतक्या वर्षांत आपल्याला जें मिळवितां आलें नाहीं तें भरतानें अगदीं थोड्या वेळांत संपादन केलें, असें रामालाहि त्याचें हें थोरपणाचें वागणें पाहून वाटलें.

भरतालाहि समाधान वाटलें कीं, आपण आपल्या प्रियजनांच्या विश्वासाला पात्र झालों. आतां प्रजाहि आपल्यावर प्रेम करील आणि लोक आपल्याला टाळणार नाहींत.

'क्षणभरहि राज्याकडे दुर्लक्ष होतां कामा नये, म्हणून तूं ताबडतोब परत जा' असा उपदेश करून रामानें लगेच त्याच दिवशीं भरताला सुमंत्रासह अयोध्येकडे परत पाठविलें. आश्रमाच्या प्रवेशद्वारापर्यंत तिघेंहि त्यांना पोहोंचवून परत आलीं.

५ * * *

सीता झाडांना पाणी घालीत होती. राम तेथें आला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून सीतेनें अनुमान केलें कीं, यांना कांहींतरी चिंता उत्पन्न झालेली आहे. तुम्ही असे काळजींत कां दिसतां, असें सीतेनें विचारलेंहि. 'तातांच्या मृत्यूच्या तडाख्यानें सारें शरीर हादरून गेलें आहें. हृदयांतील जखम अद्यापि ताजी आहे. आणि आतां त्याच ठिकाणीं दुःखाचे फटके पुन्हा बसत आहेत.' रामाचें हें दुःख दशरथाच्या शोककारक आठवणीनें उत्पन्न झालेलें होतें. कारण दुसऱ्याच दिवशीं दशरथाचें पहिलें वर्षश्राद्ध होतें. त्यासाठीं तशा परिस्थितींतहि रामाला व त्याच्या पित्याला शोभून दिसेल अशा प्रकारें श्राद्धसंकल्प कसा पार पाडतां येईल या काळजींत राम होता. इतक्यांत प्रवासी संन्याश्याचा वेष घेतलेला रावण तेथें येऊन पोहोंचला.

गृहस्थधर्माप्रमाणें रामानें त्याचें स्वागत केलें आणि पाणी आणून त्याचे पाय धुण्यासाठीं सीतेला सांगितलें. परंतु तो वेषधारी संन्यासी म्हणाला, " मी जिथे कोणाची छायाहि घेत नाहीं तिथे कोणाकडून सेवा घ्यायची गोष्टच नको ! " त्या संन्याश्याची ही निस्पृह वृत्ति पाहून रामाला त्याच्याविषयीं अर्थातच विशेष आदर वाटला. आपण काश्यप गोत्री ब्राह्मण असून सांग वेदाध्ययन केलेलें आहे असें त्या यतिवेषधारी रावणानें सांगितलें. " याशिवाय मानवीय धर्मशास्त्र, महेश्वराचें योगशास्त्र, बृहस्पतीचें अर्थशास्त्र, मेधातिथीचें न्यायशास्त्र आणि प्राचेतसाचा श्राद्धकल्पहि मी पढला आहे, " हें त्या संन्याश्याच्या तोंडून ऐकतांच तर रामाला त्याच्याविषयीं अधिकच कुतूहल उत्पन्न झालें. पितरांचें तर्पण कशानें करावें, असा प्रश्न रामानें त्याला विचारला. " श्रद्धेनें कांहींहि अर्पण केलें तरी तें श्राद्धच, " असें त्या संन्याश्यानें उत्तर दिलें. तथापि कोणत्या विशिष्ट पदार्थानें तर्पण केलें असतां उत्तम असें पुन्हा रामानें विचारल्यावरून संन्यासी सांगू लागला. " गवतांत दर्भ, वनस्पतींत तीळ, भाज्यांत चुका, माशांत मोठा शफर, पक्ष्यांत वाध्र्राणस, पशूंत बैल किंवा पाणघोडा— हीं मानवांना तर्पणासाठीं सांगितलेलीं आहेत. " परंतु संन्यासी बोलतांना मध्येंच थांबलेला पाहून रामाची उत्सुकता पूर्वीपेक्षांहि वाढली. संन्याश्याला आणखी वस्तू सांगावयाच्या आहेत पण तो भिडेनें सांगत नसावा अशी शंका रामाला आली म्हणून त्यानें त्याहि सांगून टाकण्याचा आग्रह धरला. त्या वस्तू शौर्याच्याच बळावर मिळवितां

येण्यासारख्या आहेत, असें संन्याश्यानें सांगितल्यामुळें तर रामाला तें एक प्रकारचें आव्हान वाटलें. "तर मग त्याच मी मिळवीन" असें रामानें म्हटलें. "जेथें तपाची मर्यादा संपते तेथें बाण आणि बाणाची मर्यादा संपते तेथें तप हीं दोनच माझीं साधनें आहेत," असें रामानें त्याला सांगितलें

सीतेला तेथून पळवून नेण्याच्या कपटी हेतूनें आलेल्या रावणाला नेमकी हीच संधी हवी होती. त्यानें मोठा जाणतेपणाचा आव आणून रामाला उत्तर दिलें कीं, हिमालयाच्या सातव्या शिखरावर सोनपाठी हरीण असतात. वाऱ्यासारखे चपळ, वैडूर्य मण्यासारख्या निळ्या पाठीचे आणि प्रत्यक्ष शंकराच्या मस्तकावरून खालीं कोसळणाऱ्या गंगेचें पाणी पिणारे हे हरीण श्राद्धांत पितरांना अर्पण केले असतां पितर स्वर्गाला जातात.

हें ऐकतांच रामानें लगेच आपला निश्चय सीतेला सांगून टाकला कीं, आपण आतां हें जनस्थान सोडून हिमालयांतच राहावयास जाऊं. परंतु ते हरीण माणसांच्या दृष्टीला पडत नाहींत, तेव्हां तसें तेथें जाण्याचा कांहीं उपयोग नाहीं, अशी शंका संन्यासी-वेषधारी रावणानें काढली. तेव्हां रामानें प्रतिज्ञा केली कीं, 'जर ते सुवर्णमृग हिमालयावर असतील तर एक तर हिमालयानें मला ते दाखविलेच पाहिजेत नाहींपेक्षां माझ्या भयंकर बाणांनीं मीं त्याला क्रौंच पर्वतासारखा छिन्नभिन्न केल्याशिवाय राहणार नाहीं!' रावणाला तशाहि स्थितींत रामाच्या पराक्रमाचा तो दर्प सहन होईना. परंतु रावणाला आपलें कपट नाटक पार पाडावयाचें असल्यामुळें त्यानें तेवढ्यांत

समोरच्या वनांत एक मायावी सुवर्णमृग उत्पन्न केला. आणि ‘ हिमालयानें तुझ्यावर प्रसन्न होऊन तो येथेंच तुझ्यासाठीं पाठविला आहे ’ अशी रामापाशीं बतावणी केली.

दुर्दैवानें लक्ष्मण यावेळीं तीर्थयात्रेहून परतलेल्या कुलपतींना सामोरा गेला होता. तेव्हां अखेर रामच त्या सुवर्णमृगाच्या मागें धांवला. आतां तेथें एकटी सीताच राहिली. लगेच रावणानें आपलें खरें रूप प्रकट करून सीतेला धरून तो आपल्याबरोबर घेऊन गेला. जातां जातां त्यानें जनस्थानांतील तपस्व्यांना उद्देशून गर्वानें जाहीर केलें कीं, “ हा मी दशमुख रावण रामाची पत्नी बळजबरीनें पळवून नेत आहें. जर रामाला आपल्या पराक्रमाचा अभिमान असेल तर त्यानें तो आतां प्रकट करावा. ” यावेळीं रावणाला अडविण्यासाठीं जटायू नांवाचा एक प्रचंड गिधाड पक्षी पुढें आला, परंतु रावणानें त्याचें पंख तोडून त्याला पंगू करून टाकलें.

६ * * *

रावण सीतेला पळवून नेत असतांना दोन तपस्व्यांनीं तें पाहिलें. नागिणीप्रमाणें आपल्या सुटकेसाठीं सळसळ करणारी आणि एखादी फुलवेल तोडून काढावी त्याप्रमाणें सुकून गेलेली सीता रावण जबरदस्तीनें पळवून नेत असतांना पाहून त्यांना वाटलें कीं तपोवनांतील मुनिजनांच्या तपश्चर्येची सिद्धीच हा रावण पळवून नेत आहे. त्यांनीं सीतेच्या मदतीसाठीं हांकाहांक केली, परंतु त्यावेळीं

मदतीला येण्यासारखें तेथें कोण होतें? दशरथाविषयीं मित्रभाव असणारा गिधाडांचा राजा जटायू मात्र आयत्या वेळीं तेथें आला. त्यानें आपल्या सर्व शक्तीनिशीं आकाशमार्गानें चाललेल्या रावणावर हल्ला केला. परंतु बोलून चालून तो पक्षी! त्यानें आपल्या परीनें केवढाहि पराक्रम केला आणि राक्षसराज रावणालासुद्धां आठवण राहील असा तडाखा दिला, तरी शेवटीं त्याचें बळ किती चालणार? रावणाच्या तलवारीनें पंख तुटून अरण्यांतला एखादा वृक्ष मत्त हत्तीनें उन्मळून टाकावा त्याप्रमाणें आकाशांतून तो खालीं कोसळला. त्या दोघांहि तपस्व्यांनीं जटायूला उत्तम गति मिळो अशी प्रार्थना करून ती सर्व हकीकत रामाला सांगण्यासाठीं ते दोघेहि निघाले.

याच काळांत भरताच्या सूचनेवरून सुमंत्र रामाच्या समाचाराकरितां जनस्थानांत येऊन गेला होता. त्याला तेथें सीताहरणाचें व राम–लक्ष्मण किष्किधा नगरीला निघून गेल्याचें वृत्त समजलें होतें. त्यामुळें इक्ष्वाकु कुळाचा तो वृद्ध सेवक दुःखानें अगदीं जर्जर होऊन गेला होता. तो भरताकडे परत आला तेव्हां मनाशीं म्हणाला, "अरेरे! मी राजाचा मृत्यु पाहिला. माझ्या राजाच्या पुत्रावर कोसळलेली आपत्तीहि मला पाहावी लागली; आणि आतां मिथिलाधिपतीची मुलगीहि हरण करून नेल्याचें ऐकण्याचें माझ्या नशिबीं आलें आहे. मला वाटतें कीं माझ्या जीवनांतलें सर्व सुकृतच नष्ट झालें आहे."

सुमंत्र भरताला भेटण्यासाठीं त्याच्यापुढें येऊन उभा राहिला तरी तो आपल्या या दुःखविचारांतच बुडून गेलेला

होता. थोड्या वेळानें भानावर आल्यावर सुमंत्रानें सांगितलें कीं, मी पाहिलें तेव्हां रामाचा आश्रम रिकामा पडलेला होता. मी असें ऐकलें कीं ते वानरांच्या किष्किंधा प्रदेशांत निघून गेले. वानरांना माणसांमाणसांतला भेद कळत नाहीं तेव्हां तेथें त्यांना राहणें कष्टाचेंच होत असेल, असें भरतानें बोलून दाखविलें. परंतु त्यावर सुमंत्रानें सांगितलें कीं, खालच्या वर्गांतल्या प्राण्यांतहि कृतज्ञताबुद्धि असते. त्याचें स्पष्टीकरण म्हणून सुमंत्र सांगू लागला कीं, " सुग्रीव या वानरांच्या राजाचें सिंहासन त्याचा भाऊ वाली यानें बळकावलें होतें, इतकेंच नव्हे तर सुग्रीवाची बायकोहि तो बळकावून बसला होता. परंतु रामानें समदुःखी असल्यामुळें सुग्रीवाची या संकटांतून मुक्तता केली. "

सुमंत्रानें म्हटल्याप्रमाणें राम व सुग्रीव " समदुःखी " कसे याचें भरताला कोडें पडलें. जी गोष्ट आत्तांपर्यंत सुमंत्रानें भरतापासून लपवून ठेवली होती ती आतां त्याला सांगून टाकल्याखेरीज कांहीं उपाय नव्हता. कारण एरवीं राम व सुग्रीव यांना आपण " समदुःखी " कां म्हटलें त्याचें स्पष्टीकरण सुमंत्राला देतां येण्यासारखें नव्हतें. अखेर खरें काय असेल तें सांगा, नाहींतर दशरथाच्या पायाची शपथ आहे, असें जेव्हां भरतानें म्हटलें तेव्हां नाइलाजास्तव सुमंत्रानें खरी गोष्ट उघड केली. तो म्हणाला, " आतां काय करणार ! ऐक तर, रामानें तपस्व्यांची बाजू घेतल्या कारणानें बलाढ्य राक्षसाचें वैर संपादन केलें ; आणि त्यामुळें रावणानें कपटानें सीतेला पळवून नेलें. "

सीताहरणाची ही भयंकर वार्ता ऐकून भरत तर बेशुद्ध होऊनच पडला. शुद्धीवर येतांच तो रामावर कोसळलेल्या या दुर्धर प्रसंगाबद्दल दुःख करूं लागला. अर्थातच या सर्व दुःखाचें मूळ आपली आई राणी कैकयी आहे, हें त्याच्या मनांत डाचत होतेंच. तो तडक सुमंत्राला बरोबर घेऊन कैकयीकडे गेला. रामाकडे गेलेला सुमंत्र परत आला आहे हें तिला कळलेलेंच होतें. परंतु भरत तिला म्हणाला कीं, "यापेक्षांहि तुला अधिक आवडेल अशी बातमी मी सांगतों." "तर मग कौसल्या व सुमित्रा यांना बोलावणें पाठवितें" असें कैकयी म्हणाली. भरताच्या बोलण्यांतील खोंच तिच्या लक्षांत आली नव्हती. ही वार्ता त्यांनीं ऐकण्यासारखी नाहीं, असें म्हणून त्यानें कैकयीला सांगितलें, "तुझ्या सांगण्या-वरून जो राज्य सोडून वनांत निघून गेला. त्याची पत्नी सीता कोणा दुष्टानें पळवून नेली. आतां तुझ्या इच्छा तृप्त झाल्या! अरेरे, केवढें हें दुर्भाग्य! दिलदार व शूरवीर इक्ष्वाकूंनीं तुझ्यासारखी सून घरांत आणली म्हणून त्यांना आपली ही दुसरी सून परक्यांनीं पळवून नेलेली पाहावी लागत आहे."

भरताचें हें लागट बोलणें ऐकून कैकयीलाहि दुःख झालें. तिला वाटलें कीं, आजवर जी गोष्ट मागाहून सांगेन म्हणून भरतापासून आपण लपवून ठेवली होती ती स्पष्ट करून सांगण्याची वेळ आतां आली आहे. म्हणून तिनें भरताला उघडपणें विचारलें कीं, "महाराज, दशरथांना झालेला शाप तुझ्या कानावर आहे का?" परंतु भरताला यांतली खरोखरीच कांहीं माहिती नव्हती. म्हणून कैक-

यीच्या सांगण्यावरून सुमंत्रानें भरताला दशरथाला झालेल्या शापाची सर्व हकीकत सांगितली.

मागें एकदा दशरथ महाराज शिकारीला गेले असतां त्यांच्या हातून चुकून एका ब्राह्मणाच्या मुलाचा वध झाला. एका आंधळया तपस्व्याचा मुलगा नदीवर पाणी भरीत असतां जो आवाज झाला तो ऐकून दशरथाला वाटलें कीं रानटी हत्तीचाच हा आवाज आहे. म्हणून त्यानें त्या आवाजाच्या रोखानें नेम धरून बाण सोडला. परंतु दुर्दैवानें तो ऋषिकुमारच त्या बाणाला बळी पडला. हें जेव्हां त्या आंधळया तपस्व्याला समजलें तेव्हां त्यानें दुःखावेगानें स्वतःचे प्राण सोडीत महाराजांना शाप दिला कीं, 'तूंहि माझ्यासारखाच पुत्रशोकानें मरशील.'

'या कारणामुळेंच वाईटपणा पत्करून मी रामाला वनवासाला पाठविलें; मला राज्याचा लोभ सुटला म्हणून नव्हे,' असें कैकयीनें भरताला सांगण्याचा प्रयत्न केला. साधूचा शाप कधींच खोटा ठरला नसता म्हणून अशाप्रकारें राजाला पुत्रवियोग घडवून आणला असेंहि तिनें सांगितलें. परंतु भरताचें एवढयानें कांहीं समाधान झालें नाहीं. "मुलाला दूर करावयाचा तर मग मलाच कां नाहीं केलेंस ?" असें भरतानें विचारल्यावर कैकयीनें त्याचें उत्तर दिलें कीं, तूं तर लहानपणापासून वडिलांपासून दूर आजोळीं असल्यामुळें तुझा वियोग त्यांना जाणवण्यासारखा नव्हता. त्यावर भरतानें पुन्हा विचारलें कीं, रामाला वनवासाला या कारणासाठींच पाठवावयाचें होतें तर तें चौदा वर्षें कशासाठीं ? त्यावरहि कैकयीनें खुलासा केला

कीं, मला चौदा वासरच (दिवस) म्हणावयाचें होतें परंतु त्या वेळीं उडालेल्या गोंधळांत माझ्या तोंडून 'वासर'-ऐवजीं 'वत्सर' (वर्षें) असें निघून गेलें.

कैकयीची ही सर्व बतावणीच आहे असें अजूनहि भरताला वाटत होतें. म्हणून त्यानें प्रश्न केला कीं, ही गोष्ट वडीलधाऱ्यांना माहीत होती काय ? वसिष्ठ, वामदेव आणि तशा इतर ज्येष्ठ मंडळींना ही गोष्ट माहीत होती, इतकेंच नव्हे तर त्यांची या गोष्टीला संमतीहि होती असें कैकयीनें सांगितल्यावर मात्र भरताला आपल्या वागणुकीचा पश्चात्ताप झाला. "बंधुप्रेमामुळें रागाच्या भरांत मी तुझी निर्भर्त्सना केली याबद्दल तूं मला क्षमा कर" असें लगेच भरत तिला म्हणाला. तेव्हां, कोणती आई आपल्या पुत्राला त्याच्या अपराधाची क्षमा करून जवळ करणार नाहीं, असें म्हणून कैकयीनेंहि त्याचें सांत्वन करीत सांगितलें कीं, यांत तुझाहि कांहीं दोष नाहीं.

आतां भरतापुढें मुख्य प्रश्न होता रामाच्या साहाय्याला जाण्याचा. म्हणून त्यानें जाहीर केलें कीं, "माझ्या उदारधी भावाच्या साहाय्यासाठीं मी आजच्या आज सारें राजमंडळ गोळा करीन आणि चालून जाणाऱ्या आमच्या प्रचंड सैन्याच्या भयानें सागर आणि रावण या दोघांच्याहि तोंडचें पाणी पळवून लावीन."

इतक्यांत कौसल्येला सीताहरणाची हकीकत कळल्यामुळें ती मूर्च्छित होऊन पडल्याचें सेवकानें येऊन सांगितलें. तेव्हां तिचें सांत्वन करण्यासाठीं सर्वजण तिकडे निघून गेलीं.

७ * * *

रामानें, तिन्ही लोकांचा शत्रु असलेल्या रावणाचा वध केला. आपली पत्नी पळवून नेणाऱ्या दुष्टाला धुळीला मिळविलें. राक्षसकुळांत जन्म घेऊनहि सद्गुणी असलेल्या बिभीषणाला लंकेच्या सिंहासनावर बसविलें. आणि राम सीतेला बरोबर घेऊन जनस्थानांत परत आला. सीतेच्या निष्कलंक चारित्र्याचें प्रमाण देवांनीं व सिद्धांनींहि दिलें होतें. रामाच्या बरोबर अस्वल, राक्षस व वानर यांचे नेते आले होते. अशा विजयी होऊन आलेल्या रामाच्या स्वागताची तयारी जनस्थानांतील तपस्वीजनांनीं मोठ्या कसोशीनें केली. मात्र कांहीं आश्रमवासीयांच्या मनांत एक भीति डोकावत होती कीं, रामाबरोबर कांहीं राक्षसहि येणार तेव्हां त्या नरभक्षकांनीं आपल्यालाच खाऊन टाकलें तर ! परंतु कुलपतींनीं त्यांना सांगितलें कीं भिण्याचें कांहीं कारण नाहीं. राक्षस आले तरी ते बिभीषणाच्या आज्ञेबाहेर नाहींत आणि बिभीषण हा इतर राक्षसांसारखा नाहीं.

जनस्थानांत आल्यावर रामाला मोठें समाधान वाटलें. तो मनांत म्हणाला, वाढत्या शक्तीच्या रावणाचा आपण वध केला आणि जगांतील सर्व सद्गुण जिच्या ठिकाणीं आहेत अशी आपली पत्नी सीता आपण त्याच्या हातून सोडवून आणली. सीता दिव्यांतून पार पडून विशुद्ध राहिली, निष्कलंक ठरली. वडिलांचें वचन आपण अक्षरशः खरें करून दाखविलें. आणि आतां तपस्व्यांच्या या विश्रामस्थानांत -जनस्थानांत आपण परत आलों आहोंत. ऋषिपत्न्यांना

नमस्कार करून त्याचे आशीर्वाद घेण्यासाठीं आंत गेलेली सीताहि थोड्या वेळानें बाहेर येऊन रामाजवळ उभी राहिली. तेव्हां राम जुन्या आठवणी काढून म्हणाला, " मैथिली, तुला आठवतें का मागें आपण जनस्थानांत राहिलों होतों ? त्यावेळीं तूं वाढविलेलीं तुझीं मानस-मुलें, हे वृक्ष तुला आठवतात का ?" " हो, हो, तर ! पण त्यावेळीं ते किती लहान होते. तेव्हां त्यांचीं पानें सहज दिसत असत.आज मात्र त्यांच्याकडे पाहावयाचें म्हणजे मान वर करून पाहावें लागतें. " सीतेनें उत्तर दिलें. " उंच आणि नीच, हा सर्व काळाचाच खेळ आहे, " असें म्हणून रामानें आणखीहि कित्येक जुन्या आठवणी सांगितल्या. बोलतां बोलतां त्यानें ती तळ्याच्या कांठीं बसली असतांना दिसलेल्या त्या सुवर्णमृगाची आठवण काढली. तेव्हां मात्र भीतीनें कांपत सीता म्हणाली, " नको, नकोत त्या भयंकर आठवणी. "

राम-सीतेचा हा संवाद चालला होता तोंच तें सारें बन एका प्रचंड सैन्याच्या आगमनानें दुमदुमून गेलें. शंख निनादूं लागले, भेरी वाजूं लागल्या, योद्ध्यांच्या आरोळ्या ऐकूं येऊं लागल्या आणि धुळीचे लोटच्या लोट आकाशांत जातांना दिसूं लागले. बरोबर मोठें सैन्य घेऊन भरत भेटीसाठीं येत असल्याचें लक्ष्मणानें येऊन सांगितलें. भरताबरोबर तिन्ही माताहि आलेल्या होत्या. रामानें आणि त्यानंतर क्रमानें लक्ष्मण व सीता यांनींहि वडील माणसांना नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घेतले. भरतानें रामाला कडकडून मिठी मारली. सर्व बंधु एक-मेकांना भेटले. सर्वांच्या गांठीभेटी होताहेत तोंच भरतानें

रामाला म्हटलें, “ हे श्रेष्ठ बंधु, तुम्ही आतां या राज्याची धुरा आपल्या खांद्यावर घेता ना ? ” कैकयीनेंहि भरताच्या म्हणण्याला दुजोरा देऊन ही आपली फार दिवसांपासूनची इच्छा असल्याचें सांगितलें.

वसिष्ठ व वामदेव पौरजनांना बरोबर घेऊन राज्याभिषेकाविषयीं रामाची भेट घेण्याकरितां तेथें आले. त्यांनीं आपल्याबरोबर रामाच्या राज्याभिषेकासाठीं लहानमोठ्या सर्व नद्यांचें पाणी आणलेलें होतें. शत्रुघ्नानें ही मंडळी आल्याचें येऊन सांगतांच राम कैकयीच्या आग्रहावरून अभिषेक करून घेण्यासाठीं तयार झाला. ‘ रामाचा विजय असो, ’ ‘ रावणांतकाचा विजय असो ’ अशा जयजयकारांनीं दशदिशा निनादून गेल्या. पुरोहितांनीं व निवेदकांनीं रामाच्या राज्यारोहणाच्या शुभ घोषणा केल्या.मंत्री, नोकरवर्ग व सुप्रजानन यांनीं या विजयसमारंभांत मनापासून भाग घेतला.

जनस्थानांत राहणाऱ्यांना उद्देशून घोषणा झाली : “ सूर्यानें आपल्या किरणांनीं अंधकार नाहींसा करावा त्याप्रमाणें रामानें आपल्या पराक्रमाच्या किरणांनीं जनस्थानावर शत्रूनें उत्पन्न केलेलें अपूर्व असें विषण्णतेचें घनदाट पटल दूर केलेलें आहे.कोणतेंहि अमङ्गळ जिला स्पर्श करूं शकत नाहीं,अशी सीता रामानें परत मिळवून आणली आहे. आणि लोकप्रिय रामानें आतां सर्व पृथ्वी जिंकलेली आहे.” विजयघोषणा ऐकून कैकयीचेंहि हृदय भरून आलें.

अभिषेक झाल्यानंतर राम वर आकाशाकडे पाहात आपल्या पित्याला उद्देशून म्हणाला, “स्वर्गांत का होईना,

तुम्ही सुखी असा. कांहींहि काळजी आतां करूं नका. माझ्याकडून तुमच्या ज्या अपेक्षा होत्या त्या मीं पुऱ्या केलेल्या आहेत. सज्जनांचें दुःख निवारण करून मी या पृथ्वीचा राजा झालों आहें. धर्माप्रमाणें प्रजेचें रक्षण करण्याचें मीं आतां व्रत घेतलें आहे."

राम राज्यावर बसला. छत्रचामरें त्याच्यावर ढळूं लागलीं. हें पाहून भरताला आनंदाचें भरतें आलें. कितीतरी वेळ रामाकडे पाहात राहूनहि त्याचें समाधान होईना. राम राज्यावर बसल्यामुळें आपल्या घराण्यातील पाप धुवून निघावें आणि चंद्राच्या प्रकाशांत पृथ्वी उजळून निघावी त्याप्रमाणें आपलें कुल आतां तेजानें चमकूं लागलें आहे, असें असें पाहून शत्रुघ्नाला समाधान वाटलें. रामाच्या राज्यलाभामुळें लक्ष्मणाला धन्य धन्य वाटलें. सुग्रीव, नील, मेंद, जांबुवंत, हनुमंत यांनीं रामाचें या शुभप्रसंगीं मनःपूर्वक अभिनंदन केलें. रामानेंहि त्यांच्या साहाय्यामुळेंच हे दिवस लाभले म्हणून त्यांच्याविषयीं कृतज्ञता प्रकट केली.

कैकयीला हा सर्व आनंदसोहळा पाहून आनंद झालाच; परंतु तिची इच्छा हें सर्व वैभव अयोध्येंत पुन्हा प्रकट व्हावें अशी होती. त्यामुळें तिच्या आग्रहास्तव सर्वांनीं त्याच दिवशीं पुष्पक विमानांत बसून अयोध्येला यावें असें ठरलें. त्याप्रमाणें राम आपले आप्त व मित्रपरिवार यांच्यासह अयोध्येकडे येण्यास निघाला. तारकांच्या समूहांत उगवता चंद्रमा दिसावा त्याप्रमाणें या परिवारांत असलेला राम अयोध्यावासी लोकांच्या आजच दृष्टीला पडावा अशी इच्छा लक्ष्मणानेंहि प्रकट केली.

संस्कृत साहित्य सरितेचीं पुस्तकें

१. रघुवंश
२. शाकुन्तल
३. विक्रमोर्वशीय
४. मृच्छकटिक
५. प्रतिमा
६. महावीरचरित
७. उत्तररामचरित
८. मालतीमाधव
९. स्वप्नवासवदत्ता
१०. दशकुमारचरित : भाग १
११. दशकुमारचरित : भाग २
१२. वेणीसंहार
१३. कुमारसम्भव
१४. मालविकाग्निमित्र
१५. हर्षचरित
१६. नागानंद
१७. पंचरात्र
१८. रत्नावली
१९. कादम्बरी
२०. मेघदूत
२१. शिशुपालवध
२२. किरातार्जुनीय
२३. बुद्धचरित
२४. मुद्राराक्षस
२५. प्रतिज्ञायौगंधरायण
२६. अविमारक
२७. अभिषेक
२८. मध्यमव्यायोग
२९. कर्णभार
३०. उरुभङ्ग
३१. पार्वतीपरिणय
३२. नलोदय

६ आणे

प्रत्येकीं किंमत ६ आणे

वोरा अॅन्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लि०

